Mail Id - aditiexpress33@gmail.com
25 JUL 26_page-0004
25 Jul 2026
दैनिक अदिती एक्सप्रेस
Website: www.aditiexpress.in epaper.aditiexpress.in संपादक - गंगाधर अभंग डिगोळे

ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' जनजागृती सत्र उत्साहात

दै. अदिती एक्सप्रेस

आलमला, : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्रिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल, आलमला (ता. औसा, जि. लातूर) येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.

सकाळी १० ते १२ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीच्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंविषयी प्रात्यक्षिके, उदाहरणे आणि संवादात्मक चर्चेद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर योगिता जाधव आणि सायबर वॉरिअर प्राजक्ता बोरूळे यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता

(एआय)च्या साहाय्याने तयार होणारे फोटो, एआयचा सुरक्षित व जबाबदारीने वापर, तसेच मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबतही विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

याशिवाय ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या लिंक, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष घडलेल्या घटनांची उदाहरणे देत सायबर गुन्ह्यांपासून स्वतः चे संरक्षण कसे करावे, याबाबत प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती कापसे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुप्रिया जाधव मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षकांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, तसेच सायबर सुरक्षेचे नियम स्वतः पाळून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.